कर्जाच्या नावाने हवालदाराची फसवणूक

मुंबई : कर्जाच्या नावाने भारतीय लष्करात हवालदाराची फसवणूक केल्याप्रकरणी पाचजणांविरुद्ध सांताक्रुझ पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. त्यात रोहित जाधव, राहुल प्रजापती, राजेश मामुलकरसह इतर दोघांचा समावेश आहे. या गुन्ह्यांचा तपास सुरू असून अद्याप कोणालाही अटक झाली नसल्याचे पोलिसांनी सांगितले. तक्रारदार हे पुण्याच्या खेड, खालुंब्रेचे रहिवाशी असून ते भारतीय लष्करात हवालदार म्हणून काम करतात.

प्रचार संपला; आता मतदानाकडे लक्ष

प्रतिनिधी/मुंबई

अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार मंगळवारी थंडावला. या निवडणुकीसाठी गुरुवार, ३ नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून रविवार, ६ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे. अंधेरी पूर्व या एका पोटनिवडणुकीने राज्यातील राजकारण जोरदार तापले होते. उमेदवारी कोणाला इथपासून उमेदवार माघारीपर्यंत अनेक राजकीय नाट्ये या निवडणुकीत रंगली. मात्र भाजपच्या मुरजी पटेल यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने या निवडणुकीतील रंगत अखेर संपली.

शिवसेना म्हणजेच आताची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार रमेश लटके यांचे आकस्मिक निधन झाले होते. यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली. उद्धव ठाकरे यांनी रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे या मतदारसंघात शिंदे गट लढणार की भाजप असा प्रश्न होता. मात्र भाजपच्या मुरजी पटेल यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. ऋतुजा लटके या महापालिकेच्या सेवेत होत्या. त्यांनी आपल्या सेवेचा राजीनामा दिला होता. मात्र हा राजीनामा देखील वादात सापडला. राजीनामा मंजूर व्हावा यासाठी त्यांना न्यायालयात धाव घ्यावी लागली होती. अखेर न्यायालयीन लढाईनंतर त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला.

पोटनिवडणुकीतील उमेदवार

- ऋतुजा लटके शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)
- बाला व्यंकटेश विनायक नाडार (आपकी अपनी पार्टी, पीपल्स)
- मनोज श्रावण नायक (राईट टू रिकॉल पार्टी)
- नीना खेडेकर (अपक्ष)
- फरहाना सिराज सय्यद (अपक्ष)
- मिलिंद कांबळे (अपक्ष)
- राजेश त्रिपाठी (अपक्ष)

त्यानंतर राजकारणाने थोडा टर्न घेतला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या मतदारसंघात भाजपने निवडणूक लढवू नये, अशी विनंती करताना राज्याच्या राजकीय संस्कृतीची आठवण करून दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील तशीच विनंती केली.

बाळासाहेबांची शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी देखील तसे पत्र दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण पक्षातील वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय घेऊ, असे जाहीर केले. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नंतर भाजपने उमेदवारी मागे घेत असल्याचे जाहीर केले.

आगामी मुंबई महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने ही निवडणूक अतिशय महत्त्वाची होती. उद्धव ठाकरे शिवसेना, बाळासाहेबांची शिवसेना तसेच भाजप असे शक्तीप्रदर्शन होणार होते. मात्र भाजपने उमेदवारी मागे घेतल्याने या निवडणुकीतील रंगत संपली आहे. आता या पोटनिवडणुकीत एकूण सात उमेदवार रिंगणात आहेत. ३ तारखेला मतदान होणार असून, ६ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे. या निकालात कोणाचे पारडे जड आहे, याचा अंदाज अनेकांना आला आहे. मात्र प्रत्यक्षात निकालाच्या दिवशी काही उलटफेर झाल्यास अनेकांना धक्का बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सायन पुलावर द बर्निंग कार

प्रतिनिधी/मुंबई

अवंती मिर्झा आणि तिचा ड्रायव्हर शिवबहादूर ठाण्याहून मलबार हिल येथे जात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, सायन आणि माटुंगा दरम्यान फ्लायओव्हरवर त्यांची कार आली असता अचानक गाडीतून धूर येऊ लागला. त्यामुळे जागीच चालकाने कार थांबवून मालकाला कारमधून उतरण्यास सांगितले आणि तोही बाहेर पडला. काही वेळातच कारला आग लागली. सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच माटुंगा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अग्निशमन दलाला याची माहिती देताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवेपर्यंत कार जळून खाक झाली. दरम्यान, फ्लायओव्हरवर आग लागल्याने सुमारे अर्धा तास वाहतूक ठप्प झाली होती.

कॅगद्वारे चौकशी करताना पालिका आयुक्तांना पदावरून हटवा!

समाजवादीचे आमदार रईस शेख यांची मागणी

प्रतिनिधी/मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या ७६ कामांची चौकशी कॅगमार्फत केली जाणार आहे. पालिका आयुक्तांना खर्चाचे अधिकार दिलेल्या कोरोना काळातील ही चौकशी होणार आहे. ही चौकशी करताना संबंधित अधिकारी त्याच पदावर कार्यरत असणे शासनाच्या नियमावलीनुसार योग्य नाही. त्यामुळे पालिका आयुक्त व प्रशासक इकबाल सिंग चहल यांना पदावरून हटवावे, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार व पालिकेतील माजी गटनेते रईस शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

मुंबई पालिकेच्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या ७६ कामांची कॅगद्वारे चौकशी करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय अत्यंत धाडसी असल्याचे शेख यांनी म्हटले आहे. या निर्णयाचे शेख यांनी स्वागत केले आहे. याबाबत वारंवार राज्य सरकार, पालिका आयुक्त यांच्याकडे आपणही लेखी तक्रार केली होती, असे शेख यांनी म्हटले आहे. पालिकेमार्फत निशल्प रियल्टीज यांच्याकडून दहिसर येथील जमीन व्यवहारातील आर्थिक गैरव्यवहाराबाबत तत्कालीन विधानसभा अध्यक्ष यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करून त्यांच्या निदर्शनास सदर बाब आणून दिली होती, असे शेख यांनी म्हटले आहे.

मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीने १७ मार्च २०२० रोजी आयुक्तांकडे आर्थिक निर्णय घेण्याचे अधिकार दिले होते. याबाबत स्थायी समितीमार्फत ठराव देखील पारित करण्यात आला होता. ज्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील विकासकामांची कॅगमार्फत चौकशी सुरू होणार आहे.

एमडी ड्रग्जची विक्री करणाऱ्या चौघांना अटक

मुंबई : मुंबईसह ठाण्यात एमडी ड्रग्जची विक्री करणाऱ्या एका टोळीचा नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी पर्दाफाश केला. याच गुन्ह्यात चौघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे ६० लाख रुपयांचे १ किलो ४३१ ग्रॅम वजनाचा उच्च प्रतीचा एमडी ड्रग्जचा साठा जप्त केला आहे. त्यांच्याविरुद्ध एनडीपीएस कलमांतर्गत कारवाई करण्यात आली असून त्यांची अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू आहे. ठाण्यातील मुंब्रा परिसरात एमडी ड्रग्ज करणारा एक सप्लायरची माहिती एनसीबीच्या मुंबई युनिटच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीनंतर या पथकाने २२ ऑक्टोबरला तिथे साध्या वेशात पाळत ठेवून इक्बाल नावाच्या एका ड्रग्ज सप्लारला अटक केली होती.

NOTICE
Doodhsagar CHSLGoregaon (East), Mumbai - 65
Society of 300 members bearing a land parcel of about 5 acres intends to undertake redevelopment project. PMC registered with local authority & having adequate capability may contact before 10th November 2022 on the following.
E-mail:-
redevelopment@doodhsagar.in

इमारत परिसरातील पार्किंग आणि वाहतूककोंडीचे आव्हान!

नवनिर्वाचित प्रमुख अग्निशमन अधिकारी संजय मांजरेकर यांची विशेष मुलाखत

गिरीश चित्रे/मुंबई

मुंबईत गेल्या वर्षात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून आगीच्या घटना टाळण्यासाठी मुंबई अग्निशमन दलाच्या उपाययोजना, मुंबई अग्निशमन दलासमोरील आव्हान, मुंबईकरांची नेमकी जबाबदारी याविषयी मुंबई अग्निशमन दलाच्या प्रमुखपदी सोमवार, ३१ ऑक्टोबर रोजी नियुक्ती झालेले संजय मांजरेकर यांनी दैनिक 'नवशक्ति'शी केलेली खास बातचीत.

नवशक्ति विशेष

■ अग्निशमन दलासमोर सर्वात मोठे आव्हान काय?

- मुंबईत आगीच्या घटना वाढल्या असून इमारत परिसरात दुतर्फा पार्किंग अग्निशमन दलासमोर मोठी अडचण ठरते. वाहतूक पोलिसांच्या माध्यमातून दिवसा अनधिकृत पार्किंग केलेल्या गाड्या टोचन करण्यात येतात. मात्र रात्री आगीची घटना घडल्यावर इमारत परिसरात दुतर्फा पार्किंग ही समस्या दूर करण्यासाठी इमारत व परिसरातील नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. अनेक वेळा पार्किंग व वाहतूक कोंडीमुळे अग्निशमन दलाला घटनास्थळी वेळीच पोहोचणे शक्य होत नाही. त्यामुळे इमारत व परिसरातील नागरिकांनी मुंबई अग्निशमन दलाची गाडी ३ मीटरची असल्याने आपत्कालीन परिस्थितीत गाडी जाण्यासाठी ५ मीटर जागा सोडणे गरजेचे आहे.

■ आगीच्या घटना रोखण्यासाठी मुंबईकरांनी काय करणे गरजेचे?

- मुंबईत आजही ४०-५० वर्षे जुन्या इमारती आहेत. या इमारतीत स्प्रिंक्लर लावणे सद्यस्थितीत शक्य नाही. मात्र नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीत स्प्रिंक्लर लावणे विकासकाला बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच अग्नी सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित ठेवणे सोसायटी व घर मालकाची जबाबदारी आहे. तसेच १० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या इमारतीत स्प्रिंक्लर लावून घ्यावे. आगीचा प्रसार होऊ नये यासाठी स्प्रिंक्लर महत्वाची भूमिका बजावते.

■ मुंबई अग्निशमन दलाच्या सक्षमीकरणासाठी कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत?

- मुंबईत टोलेजंग इमारती उभ्या राहत असून उत्तुंग इमारतीत आगीची घटना घडल्यास आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ३० मीटर उंचीवर पोहोचतील अशा शिडी आहेत. फायर बाइक तैनात आहेत, रोबोटचा समावेश करण्यात आला आहे. मनुष्यबळ वाढीवर लक्ष केंद्रित केले असून ९०० जवानांनी भरती करण्यात येणार आहे. डिसेंबर अखेरपर्यंत प्रक्रिया पूर्ण होणार असून मार्चपर्यंत पहिली तुकडी अग्निशमन दलात दाखल होईल.

■ सदोष इलेक्ट्रिक वायरिंगमुळे आगीच्या घटना टाळण्यासाठी काय करता येईल?

- घरातील इलेक्ट्रिक वायरिंगची नियमित तपासणी करून घ्यावी. तसेच आपल्या इलेक्ट्रिक मीटरचे दर पाच वर्षांनी ऑडिट करणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात आगीची घटना घडल्यास संबंधित सोसायटीवर आरोप होणार नाही.

■ मुंबईकरांना काय आवाहन कराल?

- आगीच्या घटना टाळण्यासाठी मुंबईकरांनी आपली जबाबदारी समजून योग्य ती काळजी घ्यावी. घरात सजावट करताना अग्नीजन्य वस्तूंचा वापर टाळावा. तसेच आगीची घडल्यानंतर न घाबरता काय करता येईल, यासाठी मुंबई अग्निशमन दलाला संपर्क साधत आग प्रतिबंधक उपाययोजनांचे प्रशिक्षण घ्यावे.

मुंबई, ठाण्यात १० नोव्हेंबरपर्यंत १० टक्के पाणी कपात

मुंबई : बृहन्मुंबई महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे येथील न्यूमॉटिक गेट सिस्टीममधील एअर ब्लॅडर बदलण्याचे काम मंगळवारपासून गुरुवार, १० नोव्हेंबरपर्यंत हाती घेण्यात आले आहे. या दुरुस्ती कामामुळे मुंबई व बृहन्मुंबई महानगरपालिकतर्फे ठाणे व भिवंडी महानगरपालिकेतील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार असून, १० नोव्हेंबरपर्यंत १० टक्के पाणी कपात करण्यात आली आहे. तरी नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कपातीच्या कालावधीत पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवावा. तसेच काटकसरीने पाणी वापरून सहकार्य करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अल्पवयीन मुलावर अखेर पोलिसांकडून अंत्यसंस्कार

मुंबई : ऑगस्ट महिन्यांत हत्या झालेल्या हसवान निशाद या १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलाचे कोणीही नातेवाईक न सापडल्याने अखेर मुंबई पोलिसांकडून त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. माटुंगा येथील डेव्हीड ससून औद्यागिक बालगृहात ही घटना घडली होती.

याच प्रकरणात १२ ते १७ वयोगटातील चारही अल्पवयीन मुलांविरुद्ध नंतर शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. ६ ऑगस्टला हसवानला डी. बी. मार्ग पोलिसांनी गिरगाव चौपाटी येथून ताब्यात घेतले होते. त्याचे मुंबईत कोणीही नातेवाईक नव्हते, तो कोण आणि कुठून आला आहे, याबाबत त्याला काहीच सांगता येत नव्हते. त्यामुळे त्याला माटुंगा येथील डेव्हीड ससून औद्योगिक बालसुधारगृहात पाठविण्यात आले होते. तो फारसा कोणाशी बोलत नव्हता. तो मतिमंद असल्याचे त्याच्या बोलण्यातून तसेच वागण्यातून वाटत होते. मंगळवारी १६ ऑगस्टला सायंकाळी हसवान बालगृहात बेशुद्धावस्थेत पडला होता. हा प्रकार परिचारिका फुटाने यांच्याकडून समजताच रघुवंशी यांनी तिथे जाऊन त्याला तातडीने शीव रुग्णालयात दाखल केले होते.

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२२ रोजी संपलेले सहा महिने	३०.०९.२०२१ रोजी संपलेले सहा महिने	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३२,२४४.९९	३२,०२१.०९	३२,६८६.६२	६४,२६६.०८	६०,३७६.१७	१२९,०२१.३५
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	३,५५४.५७	८,२३७.३३	११,७३०.४०	११,७९१.९०	२३,१६७.४०	४४,३२६.१०
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	३,५३५.१४	८,१८२.५३	११,५९९.६९	११,७१७.६७	२३,१८९.३७	४४,०९०.६५
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	२,६५४.९५	६,११४.१७	८,७०८.२६	८,७६९.१२	१७,४८८.३३	३३,०११.१८
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	२,७२८.४१	६,११७.९९	८,८७१.२६	८,८४६.४०	१७,६८१.९४	३३,७०६.०८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग)	१,२२२.३७	१,२२२.३७	१ ,२०३.४६	१,२२२.३७	१ ,२०३.४६	१,२२२.३७
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव						१२४,२११.३९
सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह		३१,२८८.८९		३१,२८८.८९	३१,२४७.२०	३१,२८८.८९
नेट वर्थ	१२६,३१६.५५	१२३,५८८.१४	१०७,६४९.२०	१२६,३१६.५५	१०७,६४९.२०	१२३,७०३.२५
भरणा झालेले कर्ज भांडवल		१०,९०९.९३		१२,९०८.२६	१३,६२१.३१	१३,६७४.९९
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.३३	०.३०	०.३२	०.३३	०.३२	०.३०
प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	२.१७	५.००	७.१३	७.१७	१४.३३	२७.०३
प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	२.१७	५.००	७.१३	७.१७	१४.३२	२७.०१
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	५.९७	२.३४	१८.१९	२.८५	१५.९७	१४.३६
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	७.५८	१९.८०	२२.२९	१३.४३	२०.७७	२२.८४

३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२२ रोजी संपलेले सहा महिने	३०.०९.२०२१ रोजी संपलेले सहा महिने	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	५९,८७७.५२	६३,४३०.०७	६०,३८७.१३	१२३,३०७.५९	१२३,८५२.५६	२४३,१५९.१७
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	२,६२४.५५	११,९४५.५०	१३,६०३.६१	१४,५७०.०५	२५,८६२.६९	५०,३६०.९३
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	२,६०५.१२	११,९०६.२६	१४,११९.५७	१४,५११.३८	२६,१९६.३२	५०,२२६.८७
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	१,२९७.०६	७,७१४.००	१२,५४७.७०	९,०११.०६	२२,३१६.०४	४१,७४९.३२
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	(२,११६.९१)	१,१०३.०९	११,८३२.६८	(१,०१३.८२)	२२,२१५.५४	४३,०५४.७४
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग)	१,२२१.२१	१,२२१.२१	१,२०२.२८	१,२२१.२१	१,२०२.२८	१,२२१.२१
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज						११५,८७७.२५
नेट वर्थ	१०४,८८०.९४	१०६,७४४.२२	८९,४२५.५८	१०४,८८०.९४	८९,४२५.५८	१११,८२५.००
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.६३	०.४८	०.७९	०.६३	०.७९	०.५२
प्रति समभाग प्राप्ती:						
प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	१.२४	६.३६	९.९२	७.६०	१७.३४	३३.२४
प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	१.२४	६.३६	९.९१	७.६०	१७.३२	३३.२१
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	३.१४	३.२६	११.४१	३.२३	८.८६	९.१८
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	४.११	१८.२५	१४.९०	१०.४८	११.५१	१२.८२

टीप :
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईट्स् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL

मुंबई : ३१ ऑक्टोबर, २०२२

गुंतवणुकीसाठी टाटा समूहाचा गडकरींना सकारात्मक प्रतिसाद

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : टाटा-एअर बस प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेल्यानंतर, राज्यात निर्माण झालेल्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर टाटा समूहाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना, प्रामुख्याने विदर्भातील गुंतवणुकीसंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

यासंदर्भात टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी गडकरींना पत्र पाठवले आहे. 'विदर्भ विकास मंडळ' या बिगरसरकारी संस्थेच्या सदस्यांशी संपर्क साधून विदर्भामध्ये गुंतवणुकीच्या कोणत्या नव्या संधी असू शकतील, यावर चर्चा केली जाईल, असे चंद्रशेखरन यांनी १९ ऑक्टोबर रोजी गडकरींना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे.

मंडळाने दिलेल्या माहितीच्या आधारे गडकरींनी टाटा समूहाला ७ ऑक्टोबर रोजी पत्र पाठवले होते. विदर्भात प्रामुख्याने 'मिहान'मध्ये विशेष आर्थिक विभाग (एसीझेड) आणि अन्य विभागांमध्येही औद्योगिक गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण व पूरक सुविधा उपलब्ध आहेत. नागपूरमधून ६ राज्यांतील ३५० जिल्ह्यांमध्ये त्वरित पोहोचता येऊ शकते. 'टाटा'ला उद्योग विस्ताराच्या मूबलक संधी आहेत, असे गडकरींनी पत्रात म्हटले होते. यावर टाटा समूहाने म्हटले आहे की, विदर्भात गुंतवणुकीच्या शक्यता आजमावल्या जातील.

'आप'च्या माजी मंत्र्याला 'सुरक्षे'पोटी १० कोटी

घोटाळेबाज सुकेश चंद्रशेखर याचे दिल्लीच्या नायब राज्यपालांना पत्र

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : तिहार तुरुंगात शिक्षा भोगत असलेला घोटाळेबाज सुकेश चंद्रशेखर याने 'तुरुंगातील सुरक्षे'साठी आम आदमी पक्षाचे नेते आणि माजी मंत्री सत्येंद्र जैन यांना १० कोटी दिल्याचा आरोप झाल्यानंतर, दिल्लीचे मुख्यमंत्री आणि 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी, मोरबी पूल दुर्घटनेमुळे भाजपमधील प्रचंड भ्रष्टाचार उघडकीस आला असल्याचा प्रत्यारोप मंगळवारी केला.

गुजरातमधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि आप दोन्ही पक्ष एकमेकांवर भ्रष्टाचाराचा आरोप करत आहेत.

गुजरातमध्ये भाजपची इतकी दुरवस्था झाली आहे की, भाजपला घोटाळेबाजांची मदत घ्यावी लागत आहे. तिथे निवडणूक असल्यामुळे चंद्रशेखर याच्या खांद्यावर बंदुक ठेवून भाजप 'आप'वर भ्रष्टाचाराचा आरोप करत आहे. पंजाबमधील विधानसभा निवडणुकीवेळी भाजपने कुमार विश्वास यांचा आधार घेऊन हल्लाबोल केला होता. तिथेही भाजप पराभूत झाला, गुजरातमध्येही त्याची पुनरावृत्ती होईल, असे केजरीवाल यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

घोटाळेबाज सुकेश चंद्रशेखर याने दिल्लीचे नायब राज्यपाल विरेंद्र कुमार यांना पत्र लिहून आपण सत्येंद्र जैन यांना हा 'संरक्षणनिधी' दिल्याचा दावा केला आहे. 'आप'मध्ये महत्त्वाचे पद देण्याच्या बदल्यात जैन यांना ५० कोटी दिले होते. राज्यसभेची उमेदवारी देण्याचेही वचन देण्यात आले होते, असा दावा पत्रात करण्यात आला आहे.

त्यावर, चंद्रशेखर याने कधी पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी असल्याचा बहाणा केला होता, कधी सीबीआय अधिकारी तर, कधी विधि मंत्रालयातील सचिव असल्याचा बनाव करून लोकांना फसवले होते. त्याच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवेल? गुजरातमधील मोरबी पूल दुर्घटनेवरून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजप खेळ खेळत असल्याची टीकाही या वेळी केजरीवाल यांनी केली.

तिहार तुरुंगातील 'मित्र'

चंद्रशेखर आणि सत्येंद्र जैन दोघेही तुरुंगात आहेत. त्याचा संदर्भ देत भाजपचे प्रवक्ता संबित पात्रा यांनी केजरीवाल यांच्यावर टीका केली आहे. 'केजरीवालांचे सरकार चोरांचे सरकार आहे. जब मिल बैठेंगे तीन यार, गुंजेगी तिहार की दिवार... भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचारइ', असा हल्लाबोल पात्रा यांनी केला असून केजरीवाल यांचे सरकार भ्रष्ट असल्याचा आरोप केला. त्यावर, केजरीवाल यांनी गुजरातमधील भाजप सरकार भ्रष्ट असल्याचा प्रतिआरोप केला. 'झुलता पूल बांधण्याचा अनुभव नसलेल्या कंपनीला मोरबी पूल दुरुस्त करण्याचे कंत्राट कसे दिले गेले', असा प्रश्न उपस्थित करून केजरीवाल यांनी भाजपच्या कथित भ्रष्टाचारावर बोट ठेवले.

'आप' हा भाजपचा 'ब संघ'

जयराम रमेश यांचा दावा

हैदराबाद : ''गुजरात विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि भाजपमध्ये तुल्यबळ लढत होणार आहे. दिल्लीत २०१२ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पाठिंबा लाभलेल्या चळवळीतून आम आदमी पक्षाचा (आप) उदय झाला. त्यामुळे 'आप' हा भाजपचा 'ब संघ' आहे,'' अशी टीका काँग्रेसचे संपर्कप्रमुख व सरचिटणीस जयराम रमेश यांनी मंगळवारी केली.

रमेश म्हणाले, की 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' ही संघाचीच संघटना होती. त्यातूनच 'आप'चा उदय झाला. त्यांच्यात व भाजपमध्ये कोणताही फरक नाही. भाजप आणि 'आप' केवळ खोटी लढाई लढतात. 'आप'कडून पंजाब व दिल्ली सरकारची जाहिरातबाजी गुजरातमध्ये केली जात आहे. त्यामुळे 'आप'विषयीचा पोकळ बुडबुडा प्रसारमाध्यमांतून उभा राहिला आहे. परंतु गुजरातमध्ये वास्तवातील तळागाळातील कार्यकर्त्यांचे जाळे व सुयोग्य उमेदवार पाहता काँग्रेस एक प्रबळ पक्ष आहे. त्यामुळेच आमचीच भाजपशी तुल्यबळ लढत होणार आहे. भाजपचा ब संघ असल्याने काँग्रेसची मते खाण्यासाठी व भाजपला मदत करण्यासाठीच 'आप' निवडणूक रिंगणात उतरेल.

काँग्रेस हा 'आई-मुला'चा पक्ष – अमित शहा

चंबा (हिमाचल प्रदेश) : केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी मंगळवारी काँग्रेसवर टीका करताना हा आई-मुलाचा (माँ-बेटा) पक्ष असल्याचा आरोप केला. ज्यांच्यावर आरोपपत्र दाखल आहेत, ते हिमाचल प्रदेशात चांगले सरकार कसे देऊ शकतील, असा सवालही त्यांनी केला.

भारतात आता राजा-राणीचे दिवस संपले असून या लोकशाही देशात सर्वसामान्यांचे राज्य आहे, असेही शहा यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाच्या येथील प्रचारसभेत ते बोलत होते. या राज्यात सत्तारूढ पक्ष पुन्हा निवडून येण्याची परंपरा नाही. या वेळी ही परंपरा खंडित करून पुन्हा भारतीय जनता पक्षाचे सरकार निवडून द्या, असे आवाहन शहा यांनी मतदारांना केले.

पूल दुर्घटनाग्रस्तांची मोदींकडून विचारपूस

पीटीआय, मोरबी (गुजरात)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी मोरबी येथील झुलत्या पुलाच्या दुर्घटनास्थळी भेट दिली. त्यांनी रुग्णालयांत जाऊन दुर्घटनेतील जखमींची विचारपूस केली. त्यांनी मदत आणि बचावकार्यात सहभागी झालेल्या कर्मचारी-नागरिकांशीही संवाद साधत त्यांच्या कामाचे कौतुक केले.

त्यानंतर मोदींच्या अध्यक्षतेखाली या दुर्घटनेचा आढावा घेण्यासाठी एक उच्चस्तरीय बैठक झाली. या वेळी त्यांनी सांगितले, की या दुर्घटनेशी संबंधित सर्व बाजू समजून घेण्यासाठी तपशीलवार-व्यापक तपास गरजेचा आहे. अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठीचे उपाय लवकरात लवकर अमलात आणावेत. अधिकाऱ्यांनी पीडित कुटुंबांच्या संपर्कात राहावे आणि या दुःखाच्या वेळी त्यांना सर्वतोपरी मदत मिळेल याची काळजी घ्यावी.

मृतांची संख्या १३५

दरम्यान, या दुर्घटनेतील मृतांची संख्या १३५ झाली असून, १७० जणांना वाचवण्यात यश आले आहे, अशी माहिती गुजरातचे मंत्री राजेंद्र त्रिवेदी यांनी मंगळवारी दिली. त्रिवेदी यांनी सांगितले, की लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि इतर यंत्रणांकडून मच्छू नदीत अजूनही बचावकार्य सुरू आहे. आतापर्यंत बचाव पथकांनी १३५ मृतदेह बाहेर काढले आहेत, तर १७० जणांना वाचवले आहे.

मतदान यंत्रांवरील चिन्हांविरोधातील याचिका फेटाळली

नवी दिल्ली : मतपत्रिका किंवा मतदानयंत्रांवर संबंधित उमेदवाराचे निवडणूक चिन्ह हटवावे. त्याऐवजी उमेदवाराची माहिती द्यावी, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नकार दिला. याचिकाकर्त्या वकील अश्विनी उपाध्याय हे प्रकरण निवडणूक आयोग किंवा इतर प्राधिकरणांसमोर मांडू शकतात, असे न्यायालय म्हणाले.

खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
राष्ट्रीय पुरस्कार २०११ प्राप्त
गव्हर्नमेंट सर्टिफिकेट कोर्स
ॲडव्हान्स ब्युटिशिअन कोर्स
हेअर एनोटोमी कट (११) इंटरनेशनल हेअर स्टाइल (१५) स्मुथींग, केरीटींग, हाइलाइटींग, मशीनरी फेशियल, ०३+ ओरोमा, शेरील, मिक्स फ्रुट (४) पीलिंग, पॉलिसिंग, डिटॅन, बॉडी मसाज, स्पा ट्रिटमेंट (५) मेकअप, महाराष्ट्रीयन ब्रायडल मेकअप, साडी ड्रेपींग फूल कोर्स
दि: ०२.११.२०२२ ते ३०.११.२०२२
मटेरीयल सह प्रॅक्टीस, फक्त महिलांसाठी
अधिक माहिती साठी संपर्क
शिंपोली गाव, गावदेवी मैदान जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई-९२.
नयना राठोड 9892822343

महाराष्ट्र शासन
डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई
सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४००००१

स्थापना वर्ष जाने. १९०६ दूरभाष : २२६२००५०-०२२ AISHE सांकेतांक U-1076-2019 NCTE कूट ११३०९४
संकेतस्थळ : www.secondarytrainingcollege.org ई-मेल : secondarytrainingcollege@gmail.com

क्रमांक : शाअममुं/२०२२-२३/आस्था-२/८६६ दिनांक : १.११.२०२२

शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई
निविदा सन २०२२-२३

या महाविद्यालयासाठी आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीकरिता सफाई कामगार ०१ कंत्राटी पद्धतीने भरण्याकरिता विहित आवेदनपत्र शासनमान्य कंत्राटदार पंजीकृत बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्राकडून द्वि लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. महाविद्यालयाकडे प्रति शेड्युल रु. ५० चा भरणा करून दिनांक ०३.११.२०२२ ते ०५.११.२०२२ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मिळू शकतील व दिनांक ९.११.२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत मोहोरबंद निविदा स्वीकारण्यात येतील तसेच मोहोरबंद निविदा दिनांक १०.११.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता प्राचार्यांच्या दालनात समितीसमोर उघडण्यात येतील. यासंबंधी अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.

सही/-
श्री. सुनील अर्जुन सोनवणे
शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई

डीजीआयपीआर/२०२२-२३/५/३७२०

भारत सरकार
भाभा अणू संशोधन केंद्र
न्युक्लियर रिसायकल बोर्ड
इंटिग्रेटेड न्युक्लिअर रिसायकलिंग प्लांट (ऑपरेशन) - प्रकल्प

लघू निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने महाव्यवस्थापक, आयएनआरपीओ, एनआरबी, भाअसंकें, तारापूर खालील कामांसाठी ई-निविदाकरण पद्धतीद्वारे याद्वारे ऑनलाइन नग दर निविदा दोन भागांमध्ये म्हणजेच भाग ए पात्रता निकष संबंधित कागदपत्रे आणि भाग बी वित्तीय बोलीमध्ये मागविण्यात येत आहे.

निविदा क्र.	**भाअसंकें (टी)/एनआरबी/आयएनआरपीओ/आरडब्ल्यूएम/यू/१०/२०२२ ओपीए-३०२७, दिनांकित ३१.१०.२०२२**
कामाचे नाव	डब्ल्यूआयपी, डब्ल्यूएम, भाअसंकें, तारापूर येथील एचएल सेल एक्झॉस्ट एअर फिल्टर बँकच्या एक्झॉस्ट टनेल इनलेट ग्रील ओपनिंगच्या आयसोशनसाठी एक नं. मल्टी लोअर एसएस डॅम्पर आणि दोन नग मल्टी लोअर एस एस डॅम्परचे आरेखन, उत्पादन, तपासणी, पुरवठा, बसविणे, कार्यान्वयन आणि तपासणे.
निविदाकरण पद्धत	**ऑनलाइन ई-निविदाकरण https://eprocure.gov.in/eproucre/app**
अंदाजे मूल्य	**रु. ३१,००,०००/- (रुपये एकतीस लक्ष मात्र)**
इसारा रक्कम ठेव (इरठे)	**रु. ६२,०००/- (रुपये बासष्ट हजार मात्र)**
निविदा कागदपत्राचे शुल्क	**काही नाही**
निविदा प्रक्रिया शुल्क	**काही नाही**
पूर्तता कालावधी	दहा (१०) दिनदर्शिकेचे महिने पावसाळ्यासह
निविदा विक्री कालावधी	**०२.११.२०२२ (१०.०० वा.) पासून २२.११.२०२२ (१५.०० वा.) पर्यंत**
पूर्व बोली बैठक दिनांक	**१५.११.२०२२ रोजी ११.०० वा.**
निविदांच्या ऑनलाइन सादरीकरणाचा कालावधी	**२२.११.२०२२ (१५.०० वा.)**
भाग ए चा ऑनलाइन उघडण्याचा दिनांक आणि वेळ	**२३.११.२०२२ (१५.०० वा.)**

तपशीलवार निविदा सूचना http://www.barc.gov.in/tenders वर पाहता येईल किंवा स्पष्टीकरण संपर्क : (०२५२५) २८६२३१/३२.

केंद्रीय रेल विद्युतीकरण संघटन
१, नवाब युसुफ रोड, सिविल लाईन्स/प्रयागराज - २११००१
फॅक्स क्र.: ०५३२-२४०७७९७

ई-निविदा सूचना

ई-निविदा सूचना क्र. ०२२२५०२० दिनांकित : ३१.१०.२०२२

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक, केंद्रीय रेल्वे विद्युतीकरण संघटन, प्रयागराज हे खालील ई - निविदा मागवित आहेत :-

ई - निविदा क्र.	सविस्तर वर्णन	परिमाण	निविदा देय दिनांक
०२२२५०२०	१३२ केव्ही, १ कोअर × ६३० चौ. मिमी, कॉपर एक्सएलपीई केबलचा पुरवठा	१.२ किमी	२९.११.२०२२

टिप : १. वरील ई-निविदेची पूर्ण माहिती आणि निविदा कागदपत्रे आयआरईपीएस संकेतस्थळावर म्हणजेच http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत. वरील निविदा केवळ ई- बोली स्वरूपातच स्वीकारण्यात येतील. ई-बोली निविदा उघडण्याच्या दिनांकाला ११.०० वा. पूर्वी उघडण्यात येतील.

प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक/कोर/प्रयागराज
पीआर/२६८/२०२२ एडीके भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने

स्मितसह ग्राहक सेवा

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक

निगमित सेवा विभाग
मुख्य कार्यालय : 'लोकमंगल', १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ टेलि.: ०२०-२५६१४३१३
ईमेल: cmcs@mahabank.co.in

निविदा सूचना

बँक ऑफ महाराष्ट्र, निगमित सेवा विभाग, मुख्य कार्यालय, लोकमंगल १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११००५ हे भारतातील जनरल इन्शुरन्स कंपनीज्, ज्यांनी आरएफपी प्रपत्रानुसार पूर्व पात्रता निकष पूर्ण केले आहेत, त्यांच्याकडून पुढील कामाचे विमा संरक्षण देण्यासाठी मोहोरबंद प्रस्ताव आमंत्रित करत आहे.

अ) सायबर जोखीम विमा पॉलिसीचे नूतनीकरण

आरएफपी संदर्भातील सर्व तपशील आमची वेबसाईट **www.bankofmaharashtra.in/tenders** वर उपलब्ध आहे.

मोहोरबंद प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख **दि. १७ नोव्हेंबर, २०२२, दु. ३.०० पर्यंत** आहे. कोणतेही कारण न देता कोणताही अथवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. पात्र कागदपत्रांशिवाय आलेले किंवा अपूर्ण कागदपत्र असलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

स्थळ : पुणे, दिनांक : ३१/१०/२०२२ **उप महाप्रबंधक, निगमित सेवा विभाग**

भारत सरकार
भाभा अणू संशोधन केंद्र
न्युक्लिअर रिसायकल बोर्ड

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रकल्प व्यवस्थापक, आयएनआरपीओ, एनआरबी, भाअसंकें, तारापूर हे खालील कामासाठी तत्सम स्वरूपाच्या कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या कंत्राटदारांकडून ई-निविदाकरण पद्धतीद्वारे याद्वारे ऑनलाइन नग दर निविदा म्हणजेच भाग ए पात्रता निकष संबंधित कागदपत्रे आणि भाग बी म्हणजेच वित्तीय बोली मागवीत आहेत.

निविदा क्र.	भाअसंकें (टी)/एनआरबी/आयएनआरपीओ/एसडब्ल्यूएमएफ-४३/२०२२/३६२ दिनांकित २१.१०.२०२२
कामाचे नाव	एसडब्ल्यूएमएफ, भाअसंकें, तारापूर येथे वेस्ट प्रोसेसिंग फॅसिलिटीज (डब्ल्यूपीएफ) चे बांधकाम.
निविदाकरण पद्धत	ऑनलाइन ई-निविदाकरण https://eprocure.gov.in/eproucre/app
अंदाजे मूल्य	रु. १७,४०,००,०००/- (रुपये सतरा कोटी चाळीस लाख मात्र)
इसारा रक्कम ठेव (इरठे)	रु.२७,४०,०००/- (रुपये सत्तावीस लक्ष चाळीस हजार मात्र)
निविदा कागदपत्राचे शुल्क	काही नाही
पूर्तता कालावधी	चोवीस (२४) दिनदर्शिकेचे महिने पावसाळ्यासह
निविदा विक्री कालावधी ए. निविदा कागदपत्रांचे डाऊनलोड	०४.११.२०२२ (१५.०० वा.) पासून ०३.१२.२०२२ (१५.०० वा.) पर्यंत
पूर्व बोली बैठक दिनांक	बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या बोली पूर्व समस्या ई-मेलद्वारे ११.११.२०२२ रोजीपर्यंत पाठवाव्यात. प्रकल्प व्यवस्थापक, आयएनआरपीओ (नागरी), यांच्या कार्यालयामध्ये १४.११.२०२२ रोजी (११.०० वा.) पूर्व बोली बैठक आयोजित करण्यात आली आहे. पूर्व बोली बैठक स्पष्टीकरण १७.११.२०२२ रोजी https://eprocure.gov.in/eprocure/app संकेतस्थळावर अपलोड करण्यात येतील.
शेवटचा दिनांक आणि वेळ: ए. निविदांच्या ऑनलाइन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ	**१८.११.२०२२ रोजी (१०:०० वा.) पासून ०३.१२.२०२२ (१५.०० वा.)**
बी. भाग ए ऑनलाइन उघडण्याचा दिनांक आणि वेळ	**०५.१२.२०२२ (१५.०० वा.)**

तपशीलवार निविदा सूचना http://www.barc.gov.in/tenders वर पाहता येईल किंवा स्पष्टीकरण संपर्क : (०२५२५) २९३४३४/ २९३४०२/२९४८१६.

प्रपत्र जी
रश्मी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीसाठी आमंत्रण

भारतीय नादारी आणि दिवाळखोरी (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता नादारी निर्णय प्रक्रिया) विनियम २०१६ च्या विनियम ३६ए(१) नुसार

संबंधित तपशील		
१.	पॅन/सीआयएन/एलएलपी नं.समवेत कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	रश्मी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन :यू७०१०१एमएच२००३पीटीसी१३९१५०
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	६०१-६०३, क्लासिक पेन्टॅगॉन, प. द्रुतगती महामार्ग, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९९, महाराष्ट्र.
३.	वेबसाइटची यूआरएल	http://www.rashmihousing.com
४.	कॉर्पोरेट ऋणकोच्या व्यवसायाचे तपशील	२००३ मध्ये स्थापना झालेले कॉर्पोरेट ऋणको, मुंबई महानगर प्रदेशाच्या आसपास निवासी आणि व्यापारी प्रिमाइसेसच्या विकासाच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. कॉर्पोरेट ऋणकोचे वसईमध्ये (११ प्रकल्प), विरारमध्ये (२ प्रकल्प), मीरा रोड येथे (१ प्रकल्प), नायगावमध्ये (४ प्रकल्प) प्रकल्प आहेत आणि भाईंदर (२ प्रकल्प), मालाड (१ प्रकल्प), ठाणे (१ प्रकल्प) व घाटकोपर (१ प्रकल्प) येथे पुनर्विकास प्रकल्प सुरू आहेत. संभाव्य निर्णय अर्जदार, कॉर्पोरेट ऋणकोच्या निर्णयाकरिता संपूर्ण किंवा प्रकल्पांसाठी/प्रकल्पांच्या समूहासाठी बोली लावू शकतात.
५.	कर्मचाऱ्यांची/कामगारांची संख्या	२५ कर्मचारी
६.	दोन वर्षांची उपलब्ध वित्तीय विवरणे (शेड्युल्ससह), धनकोंची सूची, कॉर्पोरेट ऋणकोच्या प्रकल्पांचे तपशील, प्रक्रियेच्या पुढील घडामोडींसाठी संबंधित तारखा यांसह अधिक तपशील येथे उपलब्ध आहेत.	rashmihousingip@gmail.com वर ईमेल करून मिळवता येतील.
७.	दी कोडच्या कलम २५(२) (एच)अंतर्गत निर्णय अर्जदारांसाठी पात्रता येथे उपलब्ध आहे:	rashmihousingip@gmail.com वर ईमेल करून मिळवता येईल.
८.	स्वारस्याची अभिव्यक्ती स्वीकारण्याची शेवटची तारीख	१७ नोव्हेंबर २०२२
९.	निर्णय व्यावसायिकांबरोबरील दळणवळणाकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	I-२१/२२, पॅरागॉन सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई ४०००१३, महाराष्ट्र, भारत. ईमेल आयडी- rashmihousingip@gmail.com

स्वाक्षरी/-
ओम प्रकाश अग्रवाल
निर्णय व्यावसायिक
रश्मी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणी क्रमांक : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००२०१/२०१७-१८/१०४४४
नोंदणीकृत पत्ता : ८०१, स्टर्लिंग टॉवर्स, थर्ड क्रॉस, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३.
दिनांक : २ नोव्हेंबर २०२२
स्थळ : मुंबई

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२२ रोजी संपलेले सहा महिने	३०.०९.२०२१ रोजी संपलेले सहा महिने	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३२,२४४.९९	३२,०२१.०९	३२,६८६.६२	६४,२६६.०८	६०,३७६.१७	१२९,०२१.३५
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	३,५५४.५७	८,२३७.३३	११,७३०.४०	११,७९१.९०	२३,१६७.४०	४४,३२६.१०
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	३,५३५.१४	८,१८२.५३	११,५९९.६९	११,७१७.६७	२३,१८९.३७	४४,०९०.६५
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	२,६५४.९५	६,११४.१७	८,७०८.२६	८,७६९.१२	१७,४८८.३३	३३,०११.१८
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	२,७२८.४१	६,११७.९९	८,८७१.२६	८,८४६.४०	१७,६८१.९४	३३,७०६.०८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग)	१,२२२.३७	१,२२२.३७	१ ,२०३.४६	१,२२२.३७	१ ,२०३.४६	१,२२२.३७
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव						१२४,२११.३९
सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह		३१,२८८.८९		३१,२८८.८९	३१,२४७.२०	३१,२८८.८९
नेट वर्थ	१२६,३१६.५५	१२३,५८८.१४	१०७,६४९.२०	१२६,३१६.५५	१०७,६४९.२०	१२३,७०३.२५
भरणा झालेले कर्ज भांडवल		१०,९०९.९३		१२,९०८.२६	१३,६२१.३१	१३,६७४.९९
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.३३	०.३०	०.३२	०.३३	०.३२	०.३०
प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	२.१७	५.००	७.१३	७.१७	१४.३३	२७.०३
प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	२.१७	५.००	७.१३	७.१७	१४.३२	२७.०१
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	५.९७	२.३४	१८.१९	२.८५	१५.९७	१४.३६
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	७.५८	१९.८०	२२.२९	१३.४३	२०.७७	२२.८४

३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२२ रोजी संपलेले सहा महिने	३०.०९.२०२१ रोजी संपलेले सहा महिने	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	५९,८७७.५२	६३,४३०.०७	६०,३८७.१३	१२३,३०७.५९	११३,८५२.५६	२४३,९५९.१७
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	२,६२४.५५	११,९४५.५०	१३,६०३.६१	१४,५७०.०५	२५,८६२.६९	५०,३६०.९३
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	२,६०५.१२	११,९०६.२६	१४,११९.५७	१४,५११.३८	२६,१९६.३२	५०,२२६.८७
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	१,२९७.०६	७,७१४.००	१२,५४७.७०	९,०११.०६	२२,३१६.०४	४१,७४९.३२
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	(२,११६.९१)	१,१०३.०९	११,८३२.६८	(१,०१३.८२)	२२,२१५.५४	४३,०५४.७४
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग)	१,२२१.२१	१,२२१.२१	१,२०२.२८	१,२२१.२१	१,२०२.२८	१,२२१.२१
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज						११५,८७७.२५
नेट वर्थ	१०४,८८०.९४	१०६,७४४.२२	८९,४२५.५८	१०४,८८०.९४	८९,४२५.५८	१११,८२५.००
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.६३	०.४८	०.७९	०.६३	०.७९	०.५२
प्रति समभाग प्राप्ती:						
प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	१.२४	६.३६	९.९२	७.६०	१७.३४	३३.२४
प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	१.२४	६.३६	९.९१	७.६०	१७.३२	३३.२१
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	३.१४	३.२६	११.४१	३.२३	८.८६	९.१८
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	४.११	१८.२५	१४.९०	१०.४८	११.५१	१२.८२

टीप :
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही / सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL

मुंबई : ३१ ऑक्टोबर, २०२२